**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**मा. अतिरिक्त आयुक्त (प.उप) यांनी दि.५.०९.२०१९ च्या क्र.अति.आ/प.उप/२८२१/I अन्वये मंजुरी दिलेल्या कनिष्ठ अभियंता (स्था) पदाच्या सुधारीत अर्हता.**

**(एक) सरळसेवेने**

**बाहेरुन थेट सरळसेवेने जे उमेदवार खालीलप्रमाणे किमान पात्रता धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून: -**

(१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांकरीता ४३ वर्षे असावे.

(२) उमेदवाराने एस.एस.सी वा समकक्ष परिक्षेनंतर ३ वर्षांची स्थापत्य वा कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग मधील पदविका संपादित केलेली असावी.

**(एक)** कनिष्ठ अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापिठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

**(दोन)** तसेच उमेदवाराने प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

(३) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवारांना एमएससीआयटी/सीसीसी परिक्षा आवश्यक नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

**(दोन) खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून निवडीने**

(१) महापालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामध्ये कोणत्याही पदावर नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेतील नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परिक्षेनंतर ३ वर्षांची स्थापत्य वा कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग मधील पदविका संपादित केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापिठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

(दोन) तसेच उमेदवाराने प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

(२) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवारांना एमएससीआयटी/सीसीसी परिक्षा आवश्यक नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

टिप - सदर संवर्गातील पदे खालीलप्रमाणे भरण्यात येतील.

(१) ८० टक्के पदे थेट सरळसेवेने भरण्यात येतील.

(२) २० टक्के पदे ज्यांनी महानगरपालिकेच्या सेवेत असताना / सेवेत येण्यापूर्वी वरील एक (२) (एक) (दोन) मधील अर्हता प्राप्त केली आहे व महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामध्ये कोणत्याही पदावर नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेत नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून भरण्यात येतील.

**तसेच जेव्हा वरील (दोन) मध्ये उल्लेख केलेले खात्यांतर्गत कर्मचारी नियुक्तीसाठी उपलब्ध न झाल्यास उरलेली पदे बाहेरील उमेदवारांमधून भरण्यात येतील.**

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) हे पद 'ब' गटात वर्गीकृत केले असल्याने अनुकंपा/वारसाहक्क तत्वाने नियुक्ती द्यावयाच्या पदांमध्ये सदर पदांचा समावेश करता येणार नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- ४/०९/१९ | सही/- ४/०९/१९ | सही/- ४/०९/१९ | सही/- ४/०९/१९ |
| **नगर अभियंता** | **प्रमुख कर्मचारी अधिकारी** | **संचालक (अ.से. व प्र.) प्र.** | **सह आयुक्त (साप्र)** |

सही/- ५/०९/१९
**अति.आयुक्त(प.उप)**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**मा. अतिरिक्त आयुक्त (प.उप) यांनी दि.५.०९.२०१९ च्या क्र.अति.आ/प.उप/२८२१/I अन्वये मंजूरी दिलेल्या कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदाच्या सुधारीत अर्हता.**

**(एक) सरळसेवेने**

**बाहेरुन थेट सरळसेवेने जे उमेदवार खालीलप्रमाणे किमान पात्रता धारण करीत असतील अशा उमेदवारांमधूनः-**

(१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांकरीता ४३ वर्षे असावे.

(२) उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परिक्षेनंतर ३ वर्षांची यांत्रिकी विद्युत /ऑटोमोबाईल/इलेक्ट्रॉनिक्स/प्रॉडक्शन इंजिनिअरींगमधील पदविका किंवा डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम/डिप्लोमा इन इंडस्ट्रीअल इलेक्ट्रॉनिक्स/डिप्लोमा प्रोग्रॅम इन इन्स्ट्रयुमेंटेशन/डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग संपादित केलेली असावी.

**(एक)** कनिष्ठ अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापिठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

**(दोन)** तसेच उमेदवाराने प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

(३) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवारांना एमएससीआयटी/सीसीसी परिक्षा आवश्यक नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

**(दोन) खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून निवडीने**

(१) महापालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामध्ये कोणत्याही पदावर नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेतील नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परिक्षेनंतर ३ वर्षांची यांत्रिकी विद्युत / ऑटोमोबाईल/ इलेक्ट्रॉनिक्स/ प्रॉडक्शन इंजिनिअरींगमधील पदविका किंवा डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम/डिप्लोमा इन इंडस्ट्रीअल इलेक्ट्रॉनिक्स/डिप्लोमा प्रोग्रॅम इन इन्स्ट्रयुमेंटेशन/डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग संपादीत केलेली असावी.

**(एक)** कनिष्ठ अभियंता पदी नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापिठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

**(दोन)** तसेच उमेदवाराने प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalance Certificate) नियुक्ती आदेशापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

(२) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च

किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवारांना एमएससीआयटी/सीसीसी परिक्षा आवश्यक नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबधित विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना एमएससीआयटी परिक्षा आवश्यक नाही.

**टिप - सदर संवर्गातील पदे खालीलप्रमाणे भरण्यात येतील.**

(१) ८० टक्के पदे थेट सरळसेवेने भरण्यात येतील.

(२) २० टक्के पदे ज्यांनी महानगरपालिकेच्या सेवेत असताना / सेवेत येण्यापूर्वी वरील एक (२) (एक) (दोंन) मधील अर्हता प्राप्त केली आहे व महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामध्ये कोणत्याही पदावर नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेत नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून भरण्यात येतील.

**तसेच जेव्हा वरील (दोन) मध्ये उल्लेख केलेले खात्यांतर्गत कर्मचारी नियुक्तीसाठी उपलब्ध न झाल्यास उरलेली पदे बाहेरील उमेदवारांमधून भरण्यात येतील.**

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) हे पद 'ब' गटात वर्गीकृत केले असल्याने अनुकंपा/वारसाहक्क तत्वाने नियुक्ती द्यावयाच्या पदांमध्ये सदर पदांचा समावेश करता येणार नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- ४/०९/१९ | सही/- ४/०९/१९ | सही/- ४/०९/१९ | सही/- ४/०९/१९ |
| **नगर अभियंता** | **प्रमुख कर्मचारी अधिकारी** | **संचालक (अ.से. व प्र.) प्र.** | **सह आयुक्त (साप्र)** |

सही/- ५/०९/१९
**अति.आयुक्त(प.उप)**